# ई - पोलीस पत्रिका

दि २९/०६/२०२२ अनु.क्र. १२०

## (अमरावती शहर पोलीसांची २०२२ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

# भाग-१

# नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

**१.पोआअ/आस्था-३/सु.वे.नि./पोना-निर्मळ/६९४३/२०२२दि.२९/०६/२०२२.**

## आदेश

संदर्भ :-**या कार्यालयाचे आदेश क्र.पोआअ/सु.वे.नि./पोना-निर्मळ/९१०/२०२२, दि.३१.०१.२०२२**

## आ दे श क्र. ०१

वेतन पडताळणी पथक, अमरावती यांचेमार्फत घेण्यात येणाऱ्या आक्षेपानुसार पोलीस हवालदार पदामध्ये पदोन्नती झाल्याने वेतनवाढ देता येत नाही फक्त ग्रेड पे लावावा, तसेच संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.सलेवको/वेपप/न.क्र./२०१८/१०/८९९, दि.०५.०३.२०१८ अन्वये कार्यवाही करणेबाबत आक्षेप नोंदविला आहे. त्याअनुषंगाने सेवानिवृत्त पोलीस नाईक ९०१, अनिल शिवाजी निर्मळ यांची सुधारीत वेतन निश्चिती करण्यात आलेली होती.

शासन पत्र गृह विभाग क्र.पोलीस १८२१/प्र.क्र.२२७/पोल५-अ,दिनांक १७.०३.२०२२ अन्व्ये तसेच मा.पोलीस महासंचाक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.पोमस/३०/रा.रा.पो.बल गट क्र.०४/पो.ह/वे.नि./७५/२०२० दिनांक २८.०३.२०२२ अन्वये पोलीस नाईक यांना पोलीस हवालदार पदी पदोन्नती नंतर म.ना.से.(वेतन) नियम ११(१)(ए) प्रमाणे वेतनवाढ देऊन वेतननिश्चिती करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहे.

त्याअनुषंगाने सेवानिवृत्त पोलीस नाईक ९०१, अनिल शिवाजी निर्मळ, यांची शासन अधिसुचना, वित्त विभाग, क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र./सेवा-९, दिनांक ३०.०१.२०१९ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा सुधारीत वेतन नियम २०१९ दि.०१.०१.२०१६ पासून राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेली आहे. दिनांक ०१.०१.२०१६ रोजीचे पदाची विद्यमान वेतन संरचना वेतन बँड+ग्रेड वेतन नुसार सुधारीत वेतन संरचना (वेतन मॅट्रीक्स) मधील वेतन स्तर मध्ये खालीलप्रमाणे सुधारीत वेतन निश्चिती करण्यात येत आहे.

| **वेतनवाढीचा दिनांक** | **विद्यमान पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतननिश्चती** | **वेतनवाढीचा दिनांक** | **सुधारीत पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतननिश्चती** |
|---|---|---|---|
| ०१/०१/२०१६ | शासन अधिसुचना दि.३०.०१.२०१९ अन्वये दि.०१.०१.२०१६ पासून सुधारीत वेतन संरचनेनुसार वेतननिश्चिती | ०१/०१/२०१६ | शासन अधिसुचना दि.३०.०१.२०१९ अन्वये दि.०१.०१.२०१६ पासून सुधारीत वेतन संरचनेनुसार वेतननिश्चिती |
| | विद्यमान मुळ वेतन १४७६० x २.५७ = रु.३७९३३.२/-<br>नजीकच्या रुपयात पुर्णाकीत करुन रु.३७९३३/- | | विद्यमान मुळ वेतन १४७६० x २.५७ = रु.३७९३३.२/-<br>नजीकच्या रुपयात पुर्णाकीत करुन रु.३७९३३/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | सुधारीत वेतन संरचनेनुसार (सातव्या वेतन आयोगानुसार) दिनांक ०१.०१.२०१६ रोजीचे वेतन एस-८ - रु.३८६०० | | सुधारीत वेतन संरचनेनुसार (सातव्या वेतन आयोगानुसार) दिनांक ०१.०१.२०१६ रोजीचे वेतन एस-८ - रु.३८६०० |
| ०१/०७/२०१६ | रु.३९८००/- एस-८ | ०१/०७/२०१६ | रु.३९८००/- एस-८ |
| ०१/०७/२०१७ | रु.४१०००/- एस-८ | ०१/०७/२०१७ | रु.४१०००/- एस-८ |
| ०१/०७/२०१८ | रु.४२२००/- एस-८ | ०१/०७/२०१८ | रु.४२२००/- एस-८ |
| ०१/०७/२०१९ | रु.४३५००/- एस-८ | ०१/०७/२०१९ | रु.४३५००/- एस-८ |
| १२/०३/२०२० | रु.४३६००/- एस-८<br>सुधारीत आश्वासित प्रगती योजनेनुसार २० वर्ष नियमित सेवा पुर्ण झाल्याने दुसरा लाभ दि.१२.०३.२०२० पासून मंजूर. दि.०१.०७.२०२० ची वेतनवाढ मंजुर केल्यानंतर वेतननिश्चितीचा नियम ११(१) (ब) विकल्प दिल्याने<br>(दि. १२.०३.२०२० ते ३०.०६.२०२० पर्यंत एस-९ मधील रु.४३६००/- अनुज्ञेय वेतन ) | १२/०३/२०२० | रु.४३६००/- एस-८<br>सुधारीत आश्वासित प्रगती योजनेनुसार २० वर्ष नियमित सेवा पुर्ण झाल्याने दुसरा लाभ दि.१२.०३.२०२० पासून मंजूर. दि.०१.०७.२०२० ची वेतनवाढ मंजुर केल्यानंतर वेतननिश्चितीचा नियम ११(१) (ब) विकल्प दिल्याने<br>(दि. १२.०३.२०२० ते ३०.०६.२०२० पर्यंत एस-९ मधील रु.४३६००/- अनुज्ञेय वेतन ) |
| | | ०१/०७/२०२० | पोलीस नाईक पदावरील वेतन स्तर एस-८ मधील दि.०१.०७.२०२० ची नियमित वेतनवाढ - रु.४४८००/- |
| | | ०१/०७/२०२० | सु.से.आ.प्र. याजनेचा दुसरा लाभ देय असल्याने नियम ११ (१) ब नुसार पुर्वीचा पदाच्या वेतनामध्ये एस-८ मध्ये मानिव वेतनवाढ :- रु.४६१००/- |
| ०१/०७/२०२० | रु.४४९००/- एस-९ | ०१/०७/२०२० | सु.से.आ.प्र. याजनेअंतर्गत वरीष्ठ पदाचे (पोहवा) वेतनश्रेणी मध्ये एस-९ मध्ये नियम ११ (एक) (ब) नुसार विकल्पानुसार दिनांक ०१.०७.२०२० ची वेतननिश्चिती रु.४६२००/- |
| ०१/०७/२०२१ | रु.४६२००/- एस-९ | ०१/०७/२०२१ | रु.४७६००/- एस-९ |
| **दिनांक ३१/०१/२०२२ रोजी नियत वयोमान सेवानिवृत्त.** | | | |

**सदरचा वेतननिश्चिती आदेश गृह विभाग तसेच पोलीस महासंचालक कार्यालय यांनी दिलेल्या आदेशाच्या अधिन राहुन निर्गमीत करण्यात येत असुन प्रस्तुत प्रकरणी होणारा खर्च २०५५-पोलीस-१०९-जिल्हा पोलीस (००) (००) जिल्हा पोलीस दल (२०५५०१६८) ०१ वेतन या लेखाशिर्षाखाली मंजुर व उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.**

**२.पोआअ/आस्था-१/मयत नाव कमी/पोना-पवार/७०२६/२०२२दि.२९/०६/२०२२.**

**आदेश**

संदर्भ -राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय,अमरावती शहर यांचे पत्र क्र.५८६/०२२.

पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवरील पोलीस नाईक/७१, संतोष सहदेवराव पवार, नेमणूक पोलीस मुख्यालय,अमरावती शहर यांचा दिनांक २१/०५/२०२२ रोजी अपघात झाल्याने त्यांचा दि.०६/०६/२०२२ रोजी उपचारादरम्यान मृत्यु झालेला आहे.त्यामुळे त्यांचे नांव महानगर पालीका,अमरावती यांनी निर्गमित केलेल्या मृत्यु प्रमाणपत्राचे आधारे या आस्थापनेवरुन दि.०७/०६/२०२२ चे माध्यान्हापुर्व पासून कमी करण्यात येत आहे.

**३.पोआअ/पशा-३/श्री.शेंडे पदो.वे.नि /७०३५/२०२२ दि.२९/०६/२०२२.**

**-:आदेश -:**

**श्री. किशोर लक्ष्मणराव शेंडे प्रशासकीय अधिकारी,** पोलीस आयुक्त अमरावती शहर यांची मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक/पोमसं/८-अ/प्र.अ.पदो./का.अ.निवडसुचि/२०२१-२२/१२३/२०२२ दिनांक २८/०४/२०२२ अन्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या जिल्हा लिपीक संवर्गातील खालील नमुद कार्यालय अधिक्षक यांना पोलीस आयुक्त अमरावती शहर आस्थापनेवर प्रशासकिय अधिकारी राजपत्रित (गट-ब) पदावर कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासुन पदोन्नती देण्यात आलेली आहे.

**श्री. किशोर लक्ष्मणराव शेंडे कार्यालय अधिक्षक,** यांना पोलीस अधिक्षक, अमरावती ग्रामीण यांचे कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअअग्रा/पशा-७/पदोन्नती/का.अ.ते प्र.अ./५७५९/२२ दि. ३१/०५/२०२२ रोजी म.नंतर कार्यमुक्त करण्यांत आले असुन ते पोलीस आयुक्त अमरावती शहर या कार्यालयाचे आस्थापनेवर **दि.०२.०६.२०२२ रोजी म.पुर्व प्रशासकीय अधिकारी या पदावर** हजर झालेले आहे.

त्याअनुषंगाने **श्री. किशोर लक्ष्मणराव शेंडे प्रशासकीय अधिकारी, पोलीस आयुक्त अमरावती शहर** यांची प्रशासकीय अधिकारी या पदावर वेतन निश्चिती करणेकरीता विकल्प सादर केलेला आहे. सदर विकल्पानुसार शासन अधिसुचना, वित्त विभाग, क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र./सेवा-९, दि.३०.०१.२०१९ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २०१९ मधील नियम क्रमांक ८ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे वेतननिश्चिती करण्यांत येत आहे.

**वेतन श्रेणी - कार्यालय अधिक्षक - एस-१४ रु. ३८६००-१२२८००**
**प्रशासकीय अधिकारी - एस-१५ रु. ४१८००-१३२३००**

| विदयमान आदेश | | | सुधारीत आदेश | | |
|---|---|---|---|---|---|
| **वेतनवाढीचा दिनांक** | **वेतन** | **वेतन स्तर** | **तपशिल व दिनांक** | **वेतन** | **वेतन स्तर** |
| ०२/०६/२०२२ | ५५१०० | एस-१४ | ०१/०७/२०२१ | ५५१००/- | एस-१४ |
| | | | ०२/०६/२०२२ | ५६२००/- प्रशासकीय अधिकारी (राजपत्रित गट-ब) वेतन श्रेणी ४१८००-१३२३०० पदावर पदोन्नती झाल्याने नियम ११ (१) ब प्रमाणे वेतननिश्चितीचा विकल्प दिल्याने दिनांक ०२/०६/२०२२ ते ३०/०६/२०२२ पर्यंत वेतन स्तर एस-१५ मधील अनुज्ञेय वेतन रु. ५६२००/- | एस-१५ |
| | | | ०१/०७/२०२२ | कार्यालय अधिक्षक पदावरील एस-१४ मध्ये पुर्वीच्या पदावरील नियमित वेतनवाढ रु.५६८००/- | |
| | | | ०१/०७/२०२२ | कार्यालय अधिक्षक पदावरील पदोन्नतीच्या अनुषंगाने वरिष्ठ पदावरील वेतनस्तर एस-१४ मध्ये मानिव वेतनवाढ-रु.५८५००/- | |
| | | | ०१/०७/२०२२ | प्रशासकीय अधिकारी पदावर एस-१५ मध्ये नियम ११ (१) (अ) प्रमाणे रु.५९६००/- मध्ये पुर्नवेतननिश्चिती | |
| | | | **पुढील वेतनवाढ** | **दि. ०१/०७/२०२३ ला देय राहील.** | |

सदर वेतन निश्चीती ही वेतन पडताळणी पथक, अमरावती यांचे अंतिम पडताळणीचे अधिन राहुन करण्यात आलेली आहे. वेतन पडताळणी पथकाकडुन होणा-या तपासणीनुसार केलेल्या वेतन निश्चीतीमध्ये बदल अपेक्षीत असल्यास/झाल्यास ज्यादा अदा झालेले वेतन व भत्ते त्याचप्रमाणे अदा झालेल्या फरकाच्या ज्यादा रकमेची वसुली करण्यात येईल.

**४.पोआअश/आस्था-५/बाल संगोपन रजा/७०३७/२०२२.दि.२९/०६/२०२२.**

## आदेश

खालील नमुद महीला पोलीस अमंलदार यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या त्यांच्या बाळाच्या संगोपनाकरिता विशेष बाल संगोपन रजा शासन निर्णय,वित्त विभाग क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२५/सेवा-६,दि.२३/०७/२०१८ मधील अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुर करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **नांव,पदनाम व बं.नं.** | **अपत्यांची संख्या** | **मंजुर बालसंगोपन रजा कालावधी** |
|---|---|---|---|
| १. | मपोना/१४७०,सुचिता राणे,पो.मुख्यालय | १ | विशेष बाल संगोपन रजा ३० दिवस |
| २. | मपोशि/२७१,रिना घोघेस्वार,पो.स्टे.राजापेठ | १ | विशेष बाल संगोपन रजा ३० दिवस |
| ३. | मपोशि/१५९८ मंगला धांडे, गाडगेनगर | १ | विशेष बाल संगोपन रजा ६० दिवस |
| ४. | मपोशि/ज्योती ढवळे, बडनेरा | २ | विशेष बाल संगोपन रजा ३० दिवस |
| ५. | मपोशि/१५५ आरती खडसे, पो.मुख्यालय | २ | विशेष बाल संगोपन रजा ६० दिवस |
| ६. | मपोशि/१७०८ वर्षा टेकाडे, महीला कक्ष | १ | विशेष बाल संगोपन रजा ३० दिवस |
| ७. | मपोशि/१६०२ रोशनी जयस्वाल फ्रेजरपुरा | २ | विशेष बाल संगोपन रजा ३० दिवस |
| ८. | मपोशि/४८९ शितल डवरे, पो.मुख्यालय | २ | विशेष बाल संगोपन रजा ३० दिवस |
| ९. | मपोशि/४०५, शितल चितोडे, पो.मुख्यालय | १ | विशेष बाल संगोपन रजा ६० दिवस |

**५.पोआअ/पशा-३/अर्जीत रजा मंजुरी/७०३९/२०२२. दि.२९/०६/२०२२.**

## आदेश

पोलीस आयुक्त अमरावती शहर या आस्थापनेवरील खालील नमुद कर्मचारी यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे त्यांना महत्वाचे काम असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा, रजा नियम १९८१ मधील ५० अन्वये अर्जीत रजा मंजुर करण्या येत आहे

| **अ.क्र** | **नाव व पदनाम** | **नेमणुक** | **अर्जीत रजा कालावधी** | **अतिरीक्त कार्यभार** |
|---|---|---|---|---|
| १. | श्री.संजय पवार, वरिष्ठ श्रेणी लिपीक | अर्ज शाखा | दि.२७/०६/२०२२ ते दि.३०/०६/२०२२ पर्यत एकुण ४ दिवस(मागील दि.२५व २६/०६/२०२२ या शासकीय सुटीस जोडून) | श्री.प्रकाश सोळंके.प्रमुख लिपीक,नेम.अर्ज शाखा. |

६.**पोआअ/विचौ-१/कसुरी/अं.आ./पोशि/१३६६-विरेंद्र सिसोदे/७०४२/०२२दि.२९/०६/२०२२.**

## अंतिम आदेश

**कसुरदाराचे नाव :-** पोशि/१३७७ विरेंद्र विनायकराव सिसोदे, नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही पोशि/१३७७ विरेंद्र विनायकराव सिसोदे नेमणूक - पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन, तुम्ही पो.स्टे. राजापेठ येथे नेमणूकीस असतांना दिनांक ११/०९/२०१९ ते दिनांक २८/०६/२०२१ पावेतो एकूण ६५६ दिवस वरिष्ठांचे पुर्व परवानगी शिवाय अनधिकृतपणे कर्तव्यावरुन गैरहजर राहील्याबाबत तुमची विभागीय चौकशी करण्यांत आली. विभागीय चौकशी मध्ये तुम्हास हजर राहण्या बाबत राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय, अमरावती यांचे मार्फतीने २ ते ३ पत्र देण्यात आले त्या अनुषंगाने तुम्ही हजर झाले तेव्हा तुम्हास विभागीय चौकशीचे संपुर्ण कागदपत्राच्या प्रती देण्यात आल्या. विभागीय चौकशी मध्ये तुमच्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप अमान्य केल्याने तुम्हास पुढील वि.चौ. चे कामकाजाचे दृष्टीने मित्र अधिकारी यांचे नाव व संमती पत्र हजर करणेबाबत सुचीत करण्यात आले होते. परंतु तुम्ही पुर्तता न केल्याने तुम्हास जावक क्र. ८९/२०२२ दिनांक ११/०४/२०२२ अन्वये मित्र अधिकारी व त्यांचे संमती पत्र दिनांक १५/०५/२०२२ रोजी हजर करण्याबाबत देण्यात आले होते. तरी सुध्दा तुम्ही हजर आले नाही. विभागीय चौकशी मध्ये तुम्ही जाणीव पुर्वक गैरहजर राहत असल्याने तसेच तुम्हास समज पत्राव्दारे कळविण्यात आलेल्या माहीतीची पुर्तता करीत नसल्याने पुन्हा जावक क्रमांक ११४/२०२२ दिनांक १०/०५/२०२२ अन्वये तुमचे विरुध्द सुरु असलेल्या विभागीय चौकशी मध्ये जाणीव पुर्वक गैरहजर राहत असल्याने विभागीय चौकशी एकतर्फी करुन समारोपीय अहवाल पाठविण्यात येईल असे नमुद करुन यासंदर्भात काही आक्षेप असल्यास दिनांक १४/०५/२०२२ रोजी ११.०० हजर राहण्या बाबत समजपत्र राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांचे मार्फतीने पाठविण्यात आले होते. सदरचे पत्र दि. ११/०५/२०२२ रोजी पोना/७१५ वाकपांजर यांचे मार्फतीने तामिल झाल्याबाबत पोलीस मुख्यालय, अमरावती यांचे जावक क्र. १२००/२०२२ दि. १७/०५/२०२२ अन्वये अहवाल प्राप्त झाला. परंतु तुम्ही नमुद पत्राचे अनुषंगाने दि. १४/०५/२०२२ रोजी सुध्दा हजर आले नाही. एकंदरीत वि.चौ. चे कार्यवाहीमध्ये कोणत्याही प्रकारचे सहकार्य केले नसुन तुम्ही जाणीव पुर्वक गैरहजर राहीले आहे.

तुम्ही अशा बेजबाबदारपणा, बेशिस्तपणाचे वर्तण केले असून तुमच्या अशा सततच्या गैरहजेरीच्या सवईमुळे इतर कर्मचाऱ्यावर विपरीत परिणात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तुमच्या अशा वर्तणामुळे पोलीस विभागाची प्रतिमा मलीन झाली आहे. तुमचे सतत गैरहजर राहण्याच्या सवईमुळे तुम्हास नोकरीची आवश्यकता दिसुन येत नाही. तुमच्या या बेशिस्त बेजाबदार व गैरवर्तवणुकीबद्दल कसूराबाबत तुमच्या विरुध्द केलेल्या विभागीय चौकशीत ठेवण्यात आलेले दोषारोप निर्वीवादपणे सिध्द होत असल्याने तुम्हास महाराष्ट्र पोलीस अधिनीयम १९५१

चे नियम २५ चे प्राधिकारान्वये तसेच महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम ३ (१) (२) चे तरतुदीनुसार " **शासकीय सेवेतुन काढुण टाकण्याची शिक्षा का ? करण्यात येवु नये "** तसेच **तुमचा गैरहजर कालावधी हा विनावेतन का करण्यांत येवू नये म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात येत आली होती.** सदरची नोटीस तुम्ही दिनांक ०१/०६/२०२२ रोजी स्विकरुन सुध्दा त्यावर आपले स्पष्टीकरण सादर केले. सादर केलेल्या स्पष्टीकरणाचे सखोल अवलोकन केले असता ते समाधानकारक दिसून आले नाही. तरी तुम्हास तुमचे म्हणणे मांडण्याकरीता दिनांक २७/०६/२०२२ रोजी मा. पोलीस आयुक्त यांचे आज्ञांकित कक्षात समक्ष बोलाविण्यात येवून तुमचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले. सादर केलेल्या स्पष्टीकरणाचे व तुमचे मौखीक म्हणणे याचा सखोल विचार केला असता ते समाधानकारक दिसून आले नाही. तसेच तुम्हाला शिस्तबंध्द पोलीस खात्यात नौकरी करण्याची (ईच्छा) नसल्याचे दिसुन येत असल्याने कारणे दाखवा नोटीस मध्ये देण्यात आलेल्या प्रस्तावित केलेल्या शिक्षेबाबत अंतीम आदेश खालील प्रमाणे निर्गमीत करण्यांत येत आहे.

## -:अंतिम आदेश:-

तुमच्या वरील कसूराबाबत मी **डॉ.आरती सिंह पोलीस आयुक्त, अमरावती शहर** याव्दारे पोशि/१३७७ विरेंद्र विनायकराव सिसोदे नेमणूक - पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांना महाराष्ट्र पोलीस अधिनीयम १९५१ चे नियम २५ चे प्राधिकारा अन्वये तसेच महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम ३ (१) (२) चे तरतुदीनुसार **शासकीय सेवेतुन काढुन टाकने या शिक्षेबाबतचे** अंतिम आदेश देण्यात येत आहे.

सदर शिक्षेने कसुरदार व्यथित होत असतील तर, हे आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसाचे आत ते योग्य मार्फतीने मा. अप्पर मुख्य सचिव गृह विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अपिल कार्यालयाचे मार्फतीने करु शकतात.

**(के.एल.शेंडे)**
प्रशासकीय अधिकारी
पोलीस आयुक्त, अमरावती शहर करीता

प्रती, पत्रव्यवहार शाखा/ सेवापट नोंदणी लिपीक, आस्थापना शाखा/सीसीटीएनएस .